21 NOV 2023
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांनी खेळाकडे करिअर म्हणून पाहावे

## कुलगुरू डॉ. शिर्के : आंतरविभागीय मैदानी स्पर्धेचे उद्घाटन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विद्यार्थ्यांनी खेळाकडे करिअर म्हणून पाहावे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

न्यू कॉलेजच्या वतीने आयोजित शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय मैदानी स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. संस्थेचे चेअरमन के. जी. पाटील यांच्या अध्यक्षस्थानी होते.

क्रीडा अधिविभागप्रमुख डॉ. शरद बनसोडे, विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक डॉ. पी. टी. गायकवाड, शिवछत्रपती पुरस्कार विजेते प्रा. आर. व्ही. शेटगे समारंभास उपस्थित होते.

बक्षीस वितरण समारंभ शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या उपस्थितीत झाला. सर्वसाधारण विजेतेपद शिवराज महाविद्यालय, गडहिंग्लजने तर द्वितीय क्रमांक न्यू कॉलेजने मिळवला. पुरुष विभागाचे विजेतेपद नाईट कॉलेज व महिला विभागाचे विवेकानंद कॉलेजने पटकावले. स्पर्धेत सर्वोत्कृष्ट पुरुष खेळाडू म्हणून प्रतीक पाटील व महिला खेळाडू म्हणून प्राजक्ता शिंदे यांना बहुमान मिळाला.

प्रा. अमर सासने यांनी स्वागत केले. प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी प्रास्ताविक केले. उपप्राचार्य डॉ. आर. डी. ढमकले यांनी आभार मानले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय मैदानी स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत के. जी. पाटील, डॉ. शरद बनसोडे, डॉ. पी. टी. गायकवाड, प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील आदी.



21 NOV 2023

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# यसबा करंडक स्पर्धेच्या लोगोचे अनावरण

## ज्येष्ठ दिग्दर्शक यशवंत भालकर स्मृती आंतरशालेय कलामहोत्सव :

प्रतिनिधी
कोल्हापूर

कोल्हापूर भूषण, शिवाजी विद्यापीठाचे माजी सिनेट सदस्य, १४ विक्रमी पुरस्कार विजेते चित्रपट दिग्दर्शक यशवंत भालकर यांच्या पाचव्या स्मृतीदिनानिमित्त यसबा करंडक आंतरशालेय कला महोत्सवाचे येत्या डिसेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात आयोजन केले आहे. या महोत्सवाच्या लोगोचे अनावरण सोमवारी करण्यात आले. यावर्षी हा महोत्सव शिवाजी विद्यापीठाचा विद्यार्थी विकास विभाग आणि चित्रपट दिग्दर्शक यशवंत भालकर फौंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शिवाजी विद्यापीठात होणार आहे.



**कोल्हापूर : यसबा करंडक कलामहोत्सवाच्या लोगोचे अनावरण शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. यावेळी पी. टी. गायकवाड, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. आलोक जत्राटकर, संदीप भालकर, संग्राम भालकर, सपना जाधव- भालकर, संदीप जाधव आदी.**

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डी. टी. शिर्के यांच्या हस्ते लोगोचे अनावरण करण्यात आले. यसबा करंडक कलापरंपरा जपण्याचे व शालेय स्तरावर कलागुणांना मुक्त उधळण करण्याचे अंगण आहे, अशा शब्दात कुलगुरू डॉ. शिर्के यांनी भावना मांडल्या. यसबा करंडक संकल्पक संग्राम भालकर यांनी महोत्सवाच्या नियोजनाविषयी माहिती दिली. येत्या डिसेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात हा महोत्सव होणार असल्याचे जाहीर केले.

यावेळी पी. टी. गायकवाड, पडॉ. अजितसिंह जाधव, डॉ. आलोक जत्राटकर, फौंडेशनचे अध्यक्ष संदीप भालकर, सपना जाधव-भालकर, संदीप जाधव, लोगो मेकर हर्षवर्धन मनीपद्मन, चित्रकार बबन माने, शताक्षी जोशी, रितेश सुतार, आशिष हेरवाडकर, ऋषीकेश मगर उपस्थित होते.

सकाळ



कोल्हापूर : यशवंत भालकर फाउंडेशनच्या वतीने यसबा करंडक आंतरशालेय कला महोत्सवाच्या लोगोचे अनावरण कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. शेजारी अन्य.

# यसबा करंडक लोगोचे अनावरण

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे माजी सिनेट सदस्य, दिग्दर्शक यशवंत भालकर यांच्या पाचव्या स्मृतिदिनानिमित्त आंतरशालेय कला महोत्सव यसबा करंडक रंगणार आहे. विद्यार्थी विकास विभाग, शिवाजी विद्यापीठ आणि चित्रपट दिग्दर्शक यशवंत भालकर फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने हा महोत्सव होणार आहे. त्याच्या लोगोचे अनावरण कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. शालेय स्तरावर कलागुणांना मुक्त उधळण करण्याचे अंगण म्हणजे हे यसबा करंडक आहे, अशा शुभेच्छा यावेळी कुलगुरू डॉ. शिर्के यांनी दिल्या. विद्यार्थी विकास विभाग संचालक पी. टी. गायकवाड, परीक्षा व मूल्यमापन मंडळांचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर, फाउंडेशनचे अध्यक्ष संदीप भालकर, उपाध्यक्ष सपना जाधव-भालकर, संदीप जाधव, हर्षवर्धन मनीपद्मन, चित्रकार बबन माने, संग्राम भालकर आदी उपस्थित होते.

लोकमत

# विद्यापीठात डिसेंबरमध्ये होणार 'यसबा करंडक'

## यशवंत भालकर यांच्या स्मृतिदिननिमित्त आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे माजी सिनेट सदस्य, १४ विक्रमी पुरस्कार विजेते चित्रपट दिग्दर्शक यशवंत भालकर यांच्या पाचव्या स्मृतिदिनानिमित्त आंतरशालेय कला महोत्सव 'यसबा करंडक-२०२३' पर्व २ रे आयोजित करण्यात येणार आहे. विद्यापीठातील विद्यार्थी विकास विभाग आणि चित्रपट दिग्दर्शक यशवंत भालकर फाउंडेशन यांच्यातर्फे हा करंडक डिसेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात विद्यापीठात होणार आहे. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते सोमवारी या लोगोचे अनावरण झाले.

यावेळी विद्यार्थी विकास विभाग संचालक पी. टी. गायकवाड, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, जनसंपर्क अधिकारी आलोक जत्राटकर, फाउंडेशनचे अध्यक्ष संदीप भालकर, उपाध्यक्ष सपना जाधव- भालकर, संदीप जाधव , हर्षवर्धन मनीपद्मन, चित्रकार बबन माने, यसबा करंडक सदस्य शताक्षी जोशी, रितेश सुतार, आशिष हेरवाडकर उपस्थित होते. संग्राम यशवंत भालकर यांनी नियोजनाची माहिती दिली.

21 NOV 2023 सकाळ जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## संभाव्य पाणीटंचाईमुळे शिवाजी विद्यापीठ प्रशासनाचे नियोजन

# परीक्षा एप्रिलअखेर संपणार

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २० : शिवाजी विद्यापीठ परिसरातील जलस्रोतांमध्ये यावर्षी ४० टक्के कमी पाणी साठले आहे. त्यामुळे आगामी काळात पाणीटंचाई भासण्याची शक्यता आहे. त्यावर दक्षता म्हणून विद्यापीठ परिसरातील अधिविभागांतील सुमारे ७५०० विद्यार्थ्यांच्या उन्हाळी सत्रातील परीक्षा एप्रिल अखेर संपविण्यात येणार आहेत. विभागांनी पाणी काटकसरीने वापरण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.



प्रशासकीय आणि अधिविभागांना विद्यापीठाच्या जलस्रोतांतून पाणी उपलब्ध करून दिले जाते. मात्र, यावर्षी पाऊस उशिराने आणि अत्यंत कमी प्रमाणात झाल्याने जलसाठे पूर्ण क्षमतेने भरलेले नाहीत. सध्याची उपलब्ध साठ्याची परिस्थिती लक्षात घेता उपलब्ध पाणी नियोजनपूर्वक वापरले नाही, तर पाणीटंचाई भासणार आहे.

त्यामुळे उन्हाळी शैक्षणिक सत्राचा कालावधी कमी करून पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा एप्रिल अखेरपर्यंत संपविण्यात याव्यात. विभागांमधील स्वच्छतागृह, प्रयोगशाळा, आदी ठिकाणी पाणी काटकसरीने वापरण्यात यावे, असे आवाहन करणारे फलक लावण्याची सूचना प्रशासनाने केली आहे.

### ७ कोटी लिटर इतके पाणी कमी

■ पावसाळ्यात दरवर्षी साधारणतः विद्यापीठातील जलस्त्रोतांमध्ये ३२ कोटी लिटर पाणी संकलित होते; पण यावर्षी कमी पाऊस झाल्याने ७ कोटी लिटर इतके पाणी कमी संकलित झाले आहे. सध्याची कमी असणारी थंडी आणि कडक उन्हाळा यामुळे बाष्पीभवनाचे प्रमाण वाढत आहे. त्याने जलस्त्रोतांमधील साठा कमी होणार असून, पाणीटंचाई जाणवणार आहे. त्यावर दक्षता म्हणून प्रशासनाकडून उपाययोजना केल्या जात असल्याचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी सांगितले.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठ हिवाळी सत्र पदवी, पदव्युत्तर परीक्षेला ७,१३८ विद्यार्थी

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षेला ७ हजार १३८ विद्यार्थी उपस्थित होते. ६१४ विद्यार्थी गैरहजर राहिले.

विद्यापीठाच्या वतीने हिवाळी सत्र परीक्षा सुरू आहेत. सोमवारी मास्टर ऑफ आर्टस्, बॅचलर ऑफ टेक्नॉलॉजी, मास्टर ऑफ सायन्स, मास्टर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन, बॅचलर ऑफ ॲप्लिकेशन, बॅचलर ऑफ इंजिनिअरिंग, मास्टर ऑफ टेक्नॉलॉजी अभ्यासक्रमांच्या परीक्षा संलग्न महाविद्यालये व अधिविभागात झाल्या. दि २० रोजी बी. कॉम. (मॅनेजमेंट), बी. कॉम (आयटी), बीएस्सी. फूड सायन्स अभ्यासक्रमांचे निकाल घोषित झाले. आजअखेर ७१ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित केल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.

पुण्यनगरी

# न्यू कॉलेज येथे मैदानी स्पर्धा सुरू

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय मैदानी स्पर्धेचे न्यू कॉलेज, कोल्हापूरने आयोजन केले होते. या स्पर्धा शिवाजी विद्यापीठाच्या सिंथेटिक ट्रॅकवर दि. १७ ते दि. १९ नोव्हेंबर या कालावधीत पार पडल्या. स्पर्धेचे उद्‌घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या प्रमुख उपस्थितीत व संस्थेचे चेअरमन के. जी. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झाले. स्वागत प्रा. अमर सासने, प्रास्ताविक प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी, तर आभार उपप्राचार्य डॉ. आर. डी. धमकले यांनी मानले. समारंभास डॉ. शरद बनसोडे, डॉ. पी. टी. गायकवाड व शिवछत्रपती पुरस्कार विजेते प्रा. आर. व्ही. शेटगे उपस्थित होते. स्पर्धेची जनरल चॅम्पियनशिप शिवराज महाविद्यालय, गडहिंग्लज, तर द्वितीय न्यू कॉलेज, कोल्हापूरने पटकावला. पुरुष विभागाची चॅम्पियनशिप नाईट कॉलेजला मिळाली. सर्वोत्कृष्ट पुरुष खेळाडू म्हणून प्रतीक पाटील व महिला खेळाडू म्हणून प्राजक्ता शिंदे यांना बहुमान मिळाला. बक्षीस वितरण समारंभास प्रमुख पाहुणे प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित होते.

पुण्यनगरी

# 'विवेकानंद'ला मैदानी स्पर्धेत अजिंक्यपद

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय मैदानी स्पर्धेत विवेकानंद कॉलेजच्या मुलींच्या संघाने जनरल चॅम्पियनशिप मिळवली. मुलींच्या संघात रिया पाटील, तन्वी जामसांडेकर, ऋतिका मगदूम, श्वेता चिकोडी, केशर दड्डे, काजल दड्डे, तितिक्षा पाटोळे व गौरी भारती, हर्षदा पाटील यांचा समावेश होता. या यशाबद्दल त्याचे श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्था सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी अभिनंदन केले. खेळाडूंना जिमखानाप्रमुख प्रा. हवालदार, एन. आर. सणगर, प्रा. सहिदा कच्छी, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण यांचे मार्गदर्शन मिळाले.

21 NOV 2023

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ : परीक्षा विभागाचे कॉपीमुक्तीला बळ

# परीक्षेत कुणाचीच नाही कदर, पकडले ६९२ कॉपीबहाद्दर

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : एकीकडे दहावी-बारावीपासून ते पदवीपर्यंतची अनेक शाळा-कॉलेज विद्यार्थ्यांना हमखास 'पास' करून देणारी केंद्रे म्हणून ओळखली जात असताना दुसरीकडे शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने बी.ए., बी.कॉम. व बी.एस्सी.च्या हिवाळी परीक्षांमध्येही बैठे व भरारी पथकाच्या माध्यमातून कॉपीमुक्त अभियान व पारदर्शक परीक्षेला बळ दिले आहे. यामुळे हिवाळी परीक्षेमध्ये विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यात १० नोव्हेंबरअखेर ६९२ विद्यार्थी कॉपी करताना आढळले आहेत. तर परीक्षा नियमांचे उल्लंघन, गोपनीयतेचा भंग केल्याने तीन परीक्षा केंद्रे रद्द केली आहेत.

विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील परीक्षांना २० ऑक्टोबरपासून सुरुवात झाली. बी.ए., बी.कॉम. व बी.एस्सी.च्या तृतीय वर्षातील परीक्षा शिवाजी विद्यापीठामार्फत घेतल्या गेल्या. या परीक्षांमध्ये पारदर्शकता असावी यासाठी परीक्षा व मूल्यमापन मंडळाने भरारी व बैठ्या पथकांमध्ये वाढ केली.

### जिल्हानिहाय कॉपी केसेस

| | |
|---|---|
| कोल्हापूर | २६१ |
| सांगली | ११३ |
| सातारा | २६८ |

### दृष्टिक्षेपात परीक्षा

| ७०० | २,३०,००० |
|---|---|
| हिवाळी सत्र परीक्षा | एकूण विद्यार्थी |

### असे आहे भरारी पथक

बैठे पथक : २७
भरारी पथक : ९, प्रत्येक पथकात तीन सदस्य-मिळून २७ सदस्य
स्पेशल भरारी पथक : २७

### काय होते कारवाई

एखादा विद्यार्थी कॉपी करताना आढळला तर पहिल्या उत्तरपत्रिकेवर कॉपीचा शेरा मारून दुसरी उत्तरपत्रिका दिली जाते. पर्यवेक्षक, भरारी व बैठे पथक यांच्याकडून त्याची तपासणी केली जाते. त्याच्याकडून कॉपी केल्याची कबुली देणारा फॉर्म भरून घेतला जातो. त्याची उत्तरपत्रिका, फॉर्म पर्यवेक्षकांच्या सहीने एकत्रित अर्ज सील करून तो परीक्षा प्रमाद समितीकडे येतो. कॉपीची तीव्रता पाहून त्यानुसार दंडात्मक कारवाई केली जाते.

### पथकाची घेतली जाते बैठक

परीक्षा सुरू होण्याआधी भरारी व बैठे पथक सदस्यांची बैठक घेतली जाते. यात कॉपीमुक्तीची रणनीती ठरविली जाते. सदस्यांचा परीक्षेचा कार्यकाळ पूर्ण झाला की त्यांच्या अनुभवाने कोणत्या केंद्रावर भरारी व बैठे पथक ठेवण्याची गरज आहे हे लक्षात घेऊन परीक्षा विभाग त्यानुसार नियोजन करते.

परीक्षा पारदर्शक व्हाव्यात, यासाठी भरारी पथकात वाढ केली आहे. केंद्रांवर बैठे पथकही ठेवले आहे. सर्वच परीक्षा केंद्रे कॉपीमुक्त झाली पाहिजेत.
- डॉ. अजितसिंह जाधव, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, शिवाजी विद्यापीठ